राज्य आरोग्य सोसायटी,मुंबई
दिनांक ०१ एप्रिल, २०२१

**समुदाय आरोग्य अधिकारी प्रशिक्षणार्थी निवडीसाठी**
**तिस-या समुपदेशन फेरीबाबत सूचना.**

आयुष्मान भारत योजनेतंर्गत समुदाय आरोग्य अधिकारी प्रशिक्षणार्थी निवडीसाठी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी प्रवेश परीक्षा घेण्यात आली होती. प्रवेश परीक्षेत पात्र उमेदवारांना प्रशिक्षण केंद्र वाटपाकरीता करीता दिनांक १५/०२/२०२१ रोजी पहिली समुपदेशन फेरी जिल्हास्तरावर व दिनांक २६/०२/२०२१ रोजी प्राचार्य,आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक, पुणे, औरंगाबाद व नागपूर यांच्या स्तरावर दुसरी समुपदेशन फेरी घेण्यात आली आहे.

तिसरी समुपदेशन फेरी दिनांक ०८ एप्रिल, २०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, पुणे पत्ता- जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, औंध छावणी पुणे- ४११०२७ येथे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी तिस-या समुपदेशन फेरी करीता उमेदवारांना खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

- पहिल्या व दुस-या समुपदेशन फेरीत ज्या उमेदवारांनी भाग घेतला नाही किंवा ज्या उमेदवारांना प्रशिक्षण केंद्र वाटप करण्यात आलेले नाही त्याच उमेदवारांकरीता तिस-या समुपदेशन फेरीचे आयोजन करण्यात आले आहे.
- पहिल्या व दुस-या समुपदेशन फेरीत ज्या उमेदवारांना प्रशिक्षण केंद्र वाटप करण्यात आले होते व त्यांनी नियुक्ती पत्र सुध्दा घेतले होते. सदर उमेदवारांनी तिस-या फेरी करीता उपस्थित राहू नये.
- कोवीड -१९ साथरोग परिस्थिती पाहता समुपदेशन फेरीस उपस्थित राहणे करीता Antigen test करणे बंधनकारक राहील. व त्याचा अहवाल (Report) सोबत घेवून यावा. सदरचा अहवाल समुपदेशनाच्या दिनांकापुर्वी ७२ तासांच्या आतील असावा.
- कोवीड-१९ साथरोगाच्या अनुषंगाने उमेदवारांनी स्वतःची काळजी घेणे आवश्यक आहे. सॅनिटायझर, मॉस्क व सामाजिक अंतर याबाबींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.
- समुपदेशन फेरीस उपस्थित राहणे करीता उमेदवारांने पुढील पैकी कोणतेही एक ओळख पत्र सोबत आणावे. (उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक आयोगाकडून मिळालेले मतदान कार्ड, वाहन चालविणाचा परवाना इ.)ओळखपत्रा शिवाय उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही. तसेच आदेश निर्गमीत केले जाणार नाही.
- उमेदवारांना अंतिम निवड यादीतील गुणवत्तेनुसार समुपदेशनास बोलविण्यात येईल.
- उमेदवारांनी समुपदेशनासाठी येतांना मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. तसेच मुळ प्रमाणपत्रांच्या दोन साक्षांकित प्रती सोबत आणाव्यात.
- प्रशिक्षण केंद्र जागा वाटप आदेश प्राप्त झाल्यानंतर उमेदवारांने संबंधित जिल्हयाच्या जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेकडे रुजू व्हावे व त्यांचे कडून प्रशिक्षण केंद्राचे आदेश प्राप्त करुन घ्यावेत.

**तिसरी समुपदेशन फेरी**
**दिनांक ०८ एप्रिल, २०२१**
**वेळ सकाळी- १०.०० वा.**
**ठिकाण :-आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, पुणे**
**जिल्हा सामान्य रुग्णालय आवार, औंध छावणी पुणे- ४११०२७**